# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

# प्रेसनोट

२०२१

गुन्हे शाखा, नवी मुंबई दिनांक ०३.०८.२०२१

## '' रिक्षा चोरी करणा-या आरोपीस नवी मुंबई गुन्हे शाखेकडुन जेरबंद''

---

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये रिक्षा चोरी झाल्याबाबत तक्रारी पोलीस ठाण्यांमध्ये प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने मा. पोलीस आयुक्त, श्री. बिपिनकुमार सिंह सो, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. डॉ. बी. जी. शेखर पाटील सो, मा. पोलीस उप आयुक्त ( गुन्हे ), श्री. प्रविण पाटील सो, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त ( गुन्हे ), श्री. विनोद चव्हाण सो, यांनी वेळोवेळी मिटींग घेवून रिक्षा चोरीच्या गुन्ह्यावर लक्ष केंदीत करून त्यांचेविरुध्द् कडक कारवाई करण्याकामी गुन्हे शाखेच्या सर्व शाखांना सूचना दिल्या होत्या.

नवी मुंबई हद्दीतील रिक्षा चोरीच्या दाखल गुन्ह्याचा समांतर तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, कक्ष २, नवी मुंबई करीत असताना पोलीस उप निरीक्षक मानसिंग पाटील यांना मिळालेल्या बातमीनुसार काही संशयीत इसम जेएनपीटी ब्रिजखाली चोरीची रिक्षा विक्री करता येणार असल्याची माहीती मिळाली. सदर माहीतीची खात्री करून गुन्हे शाखा कक्ष २ चे पथकाने सापळा लावुन संशयीत इसम नामे १) संदिप किशन रिडलान वय ३६ वर्षे, धंदा- बेकार, रा. शिवाजी नगर, झोपडपट्टी, एलपी ब्रिजच्या बाजुला, नेरूळ, नवी मुंबई. २) किशन फत्तु राठोड वय ४१ वर्षे, धंदा-पेटींग, रा. मैथी चाळ, से-४, नेरूळ, नवी मुंबई. यांना रिक्षा समवेत ताब्यात घेवुन गुन्ह्याच्या अनुषंगाने सखोल चौकशी केली असता नेरूळ पोलीस ठाणे गुर नं. २६४/२०२१, भादवि कलम ३७९ या गुन्ह्यामध्ये त्यांचा सहभाग निष्पन्न झाला. नमुद आरोपीताच्या ताबेकब्यात १) ९५,०००/- रूपये किंमतीची टिव्हीएस ऑटो रिक्षा, २) ९,०००/- रूपय किंमतीचा विवो कंपनीचा मोबाईल असे **एकुण १,०४,०००/- रूपये** किमंतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन, नेरूळ पोलीस ठाणे गुर नं. २६४/२०२१, भादवि कलम ३७९ अन्वये रिक्षा चोरीचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

सदरची कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि गणेश कराड, पोउपनि वैभव रोंगे, पोउपनि मानसिंग पाटील, सफौ एस. सांळुके, पोहवा १७३२/अनिल पाटील, पोहवा १३३९/प्रंशात काटकर, पोहवा १३४३/मधुकर गडगे, पोहवा १०३४/ज्ञानेश्वर वाघ, पोहवा ४४/सुर्यवंशी, पोहवा ४२०/सचिन पवार, पोहवा २७००/सुनिल कुदळे, पोना २०२२/रूपेश पाटील, पोना २०८२/इंद्रजित कानु, पोना २००५/ सचिन म्हात्रे, पोना २३३४/प्रफुल्ल मोरे, पोना ४४१३/अजिनाथ फुंदे, पोना १७३८/दिपक डोंगरे, यांनी उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे.

-----

# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

**प्रेसनोट** २०२१

गुन्हे शाखा, नवी मुंबई **दिनांक ०३.०८.२०२१**

## “ खुनाच्या गुन्ह्यातुन सुटून आलेला व जबरी चोरीचा प्रयत्न करणारा गुन्हेगार नवी मुंबई गुन्हे शाखेकडुन जेरबंद”

---

दिनांक १६/०७/२०२१ रोजी रात्रौ ०९:०० वाजे सुमारास इसम नामे सचिन प्रभु चव्हाण रा. देवद गांव, पनवेल व त्याचे मित्र पनवेल वरून देवद गावाकडे जात असताना पनवेल रेल्वे स्टेशन मालधक्का पटरीजवळ आरोपी राजु सुरेश थळसे रा. आझादनगर झोपडपट्टी, पनवेल व त्याचे ३ साथीदर यांनी सचिन चव्हाण व त्यांचे मित्रांवर अचानक हल्ला करून त्यांचा मोबाईल जबरीने खेचण्याचा प्रयत्न केला. सचिन चव्हाण व त्यांचे मित्रांनी विरोध केला असता चारही इसमांनी त्यांचेवर चाकुने वार करून जखमी केल्याने सदरबाबत पनवेल शहर पोलीस ठाणे गुर नं. ४०५/२०२१, भादवि कलम ३९४, ५११, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

रात्रीच्या वेळी चाकुने हल्ला करून जबरी चोरीचा प्रयत्न करणे हा गुन्हा गंभीर स्वरूपाचा असल्याने सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक करणेबाबत मा. पोलीस आयुक्त श्री. बिपिनकुमार सिंह सो, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. डॉ. बी. जी. शेखर पाटील सो, मा. पोलीस उप आयुक्त ( गुन्हे ), श्री. प्रविण पाटील सो, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त ( गुन्हे ), श्री. विनोद चव्हाण सो, यांनी आदेशीत केले होते.

सदर गुन्ह्याचा समांतर तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, कक्ष २, नवी मुंबई करीत असताना पोलीस उप निरीक्षक वैभव रोंगे यांना मिळालेल्या माहीती नुसार पाहीजे आरोपी इकबाल कादीर शहा हा कळंबोली टि-पॉईंट बायपास हायवे जवळ येणार असल्याची माहीती मिळाली. सदर माहीतीची खात्री करून गुन्हे शाखा, कक्ष २ चे पथकाने शिताफिने पाहीजे आरोपी इकबाल अब्दुल कादीर शहा यास ताब्यात घेतले. आरोपीकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्याचा गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाला. सदरचा आरोपी इकबाल कादीर शहा हा सराईत गुन्हेगार असुन, त्याचेवर खुन व जबरी चोरीचे यापुर्वी गुन्हे दाखल आहेत.

- **आरोपी इकबाल शहा याचेवर यापुर्वी दाखल असलेले गुन्हे खालीलप्रमाणे -**

१. पनवेल शहर पोलीस ठाणे गुर नं. २९१/२०१८, भादवि कलम ३०२, १२० ब
२. एन.आर.आय पोलीस ठाणे गुर नं. १९१/२०२०, भादवि कलम ३९४, ३९७, ३४.

वरीलप्रमाणे गंभीर गुन्हे केलेल्या आरोपीस गुन्हे शाखा, कक्ष २ पनवेल, यांनी बातमीदार यांचेकडुन मिळालेली माहीती तसेच तांत्रिकतपास करून शिताफिने ताब्यात घेवुन पुढील कार्यवाहीकरीता पनवेल शहर पोलीस ठाणे यांचे ताब्यात दिले.

सदरची कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि गणेश कराड, पोउपनि वैभव रोंगे, पोउपनि मानसिंग पाटील, सफौ एस. सांळुके, पोहवा १७३२/अनिल पाटील, पोहवा १३३९/प्रंशात काटकर, पोहवा १३४३/मधुकर गडगे, पोहवा १०३४/ज्ञानेश्वर वाघ, पोहवा ४४/सुर्यवंशी, पोहवा ४२०/सचिन पवार, पोहवा २७००/सुनिल कुदळे, पोना २०२२/रुपेश पाटील, पोना २०८२/इंद्रजित कानु, पोना २००५/ सचिन म्हात्रे, पोना २३३४/प्रफुल्ल मोरे, पोना १७३८/दिपक डोंगरे, यांनी उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे.

---